तरुण भारत शुक्रवार, २३ ऑगस्ट २०१९

# महाडिक अभियांत्रिकीमध्ये बँक सेल्स ॲकॅडमीचे उद्घाटन

प्रतिनिधी

इस्लामपूर

येथील श्री.व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेच्या नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आय.टी. एम. स्कील ॲकॅडमी संचलित आय.सी.आय.सी. आय बँकेच्या सेल्स अकॅडमीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे रजिस्ट्रार डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहूल महाडिक हे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठचे सेंट्रल प्लेसमेंट ऑफिसर, डॉ.जी.एस. राशीनकर, व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक महेश जोशी व महाराष्ट्र व गोवाचे आय.टी.एम.हेड, संग्राम देशमुख यांच्या प्रमुख उपस्थित होते. यावेळी महाडिक म्हणाले, आयुष्यात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चिती खुप महत्वाची आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय ठरवून त्यांच्या पुर्ततेसाठी काम केले पाहिजे.

शिवाजी विद्यापीठाचे सेंट्रल प्लेसमेंट ऑफिसर, डॉ.जी.एस.राशीनकर म्हणाले, कामाचे ठिकाण हेच आपले पहिले घर मानून काम केले तर आपण आपल्या करिअर मध्ये कधीही मागे राहणार नाही. महेश जोशी यांनी या ॲकॅडमीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले व संस्थेने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली. देशमुख यांनी आय.टी.एम.स्कील ॲकॅडमी भारतात चार शाखेद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेतात व त्याद्वारे ६०० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत, अशी माहिती दिली. यावेळी आय.सी.आय.सी. आय बँकेची मॅनेजर तनय टंडन, पुनित त्रिवेदी, प्रा.आशिष पारेख, विवेक आजमाने उपस्थित होते.